दशपर्णी अर्क बनविण्यासाठी वरील पैकी केवळ १० औषधी वनस्पतींची निवड आपणाला करावयाची आहे. परंतु शक्यतोवर पहिल्या ५ वनस्पती महत्वाच्या आहेत. त्यांचा समावेश दशपर्णी अर्कामध्ये असायलाच हवा. उर्वरित औषधी वनस्पती पैकी कुठल्याही ५ वनस्पती आपणाला उपलब्धतेनुसार निवडायच्या आहेत.

हे सर्व साहित्य मिसळेले द्रावण एका काडीने सव्य गतीने घड्याळाचे काट्यांचे दिशने मिसळून घ्या. जेणेकरुन हि सर्व वनस्पतींचे अंश त्या पाण्यात मिसळतील. नंतर तो ड्रम एका सछिद्र पोत्याने झाकून ठेवा, जेणेकरुन थेट सूर्यप्रकाश त्यावर पडणार नाही.हा ड्रम सावलीमध्ये ठेवा, जेणेकरुन त्याचे ऊन व पावसापासून संरक्षण होईल. हे द्रावण ४० दिवस सडवायचे आहे. रोज सकाळी,दुपारी व सायंकाळी एका काडीने हे द्रावण सव्य गतीने दोन मिनिटाकरिता ढवळायचे आहे.चाळीस दिवसानंतर दशपर्णी अर्क वापरण्याकरिता तयार होईल. चाळीस दिवस पूर्ण झाल्यानंतर हे द्रावण एका सुती कापडाने २-३ वेळा गाळून घ्यावे व काचेचे किंवा मातीचे भांड्यामध्ये किंवा सिमेंटचे टाकीत किंवा प्लास्टिकचे बॅरलमध्ये व द्रावण सावलीत संग्रहित करुन ठेवावे. हा दशपर्णी अर्क थेट सूर्यप्रकाश किंवा पाण्याचे संपर्कात येऊ देऊ नये. या औषधांची संग्रहण क्षमता ६ महिने आहे. तयार झाल्यानंतर हा दशपर्णी अर्क तुम्ही ६ महिन्यापर्यंत वापरु शकता. २०० लिटर पाण्यामध्ये हा ६ ते १० लिटर तयार झालेल्या दशपर्णी अर्क मिसळून कापडीने गळून पिंकावर किटकांचा किंवा अळीचा प्रादुर्भाव आढळल्यास फवारा. दशपर्णी अर्कामुळे सर्व प्रकारच्या किडींचे नियंत्रण होते.

## निमास्त्र

एका ड्रममध्ये १०० लिटर पाणी घ्या. त्यामध्ये ५ लिटर देशी गाईचे गोमुत्र मिसळा. नंतर त्यामध्ये १ किलो देशी गाईचे शेण हाताने चांगले मिसळून घ्या. नंतर ५ किलो कडूनिंबाचे पानांची चटणी बनवून त्या पाण्यात टाका व चांगले ढवळून घ्या. हे द्रावण २४ तास सडवत ठेवा. दिवसातून दोन वेळा सव्य गतीने डावीकडून उजवीकडे एका काडीने ढवळा २४ तासानंतर हे द्रावण फडक्याने गाळून घ्या व नंतर हे संपूर्ण औषध (निमास्त्र) पाणी न मिसळता पिंकावर फवारा. निमास्त्रमुळे सर्व प्रकारच्या मिलीबग व रस शोषणाऱ्या अळयांचे नियंत्रण होते.

## ब्रम्हास्त्र

देशी गाईचे २० लिटर गोमुत्र घ्या. त्यामध्ये कडूनिंबाचे पानांचा ३ किलो लगदा मिसळा. नंतर २ किलो सीताफळाची पाने, २ किलो पपईची पाने, २ किलो करंजाची पाने, २ किलो एरंडीची पाने, २ किलो घाणेरीची पाने, २ किलो धोतरयाची पाने घ्या. या सर्व पानांचा लगदा बनवून तो त्या गोमुत्रामध्ये टाका. नंतर हे द्रावण एकसारख्या चार उकळया येईपर्यंत चुलीवर उकळा. उकळल्या नंतर ४८ तास हे द्रावण थंड होऊ द्या. नंतर कापडाने गाळून घ्या. आता हे ब्रम्हास्त्र तयार झाले. हे तयार ब्रम्हास्त्र साठवून ठेवा. १०० लिटर पाण्यामध्ये ३ लिटर ब्रम्हास्त्र पिकांवर फवारल्यास रस शोषणारी अळी, फळे व शेंगा पोखरणारी अळी यांचे नियंत्रण होते. हे ब्रम्हास्त्र तुम्ही बनविल्यानंतर ६ महिनेपर्यंत वापरु शकता.

## अग्निअस्त्र

देशी गाईचे २० लिटर गोमुत्र एका भांड्यात घ्या. त्यामध्ये १ किलो तंबाखू बारीक करुन टाका. नंतर ५०० ग्रॅम गावराणी तिखट हिरव्या मिरचीचा लगदा करुन त्यात टाका. नंतर ५०० ग्रॅम देशी लसुणचा लगदा बनवून त्यामध्ये टाका कडूनिंबाच्या ५ किलो पानांचा लगदा बनवून त्यामध्ये टाका.नंतर हे द्रावण व लागोपाठ चार उकळ्या येईयपर्यंत उकळा. उकळल्यानंतर ४८ तास हे द्रावण थंड होऊ द्या. ४८ तासांनंतर हे द्रावण कापडाने गाळून घ्या व एका बाटलीत किंवा कॅनमध्ये संग्रहित करुन ठेवा. हे तयार झालेले अग्निअस्त्र तुम्ही ३ महिनेपर्यंत फवारणी साठी वापरु शकता. अग्निअस्त्र पाने, फळे, शेंगा खाणारी अळी व खोड पोखरणारी अळींचे नियंत्रण करते. १०० लिटर पाण्यामध्ये ३ ते ५ लिटर अग्निअस्त्र मिसळून फवारावे. दशपर्णी अर्क तयार करण्यासाठी ४० दिवस लागतात. त्यामुळे ताबडतोब वापरण्यासाठी दशपर्णीला पर्याय म्हणून हे ब्रम्हास्त्र व अग्निअस्त्र दिलेले आहे.

नैसर्गिक शेती पद्धत


| संचालक | प्रकाशक | लेखन व संकलन |
| --- | --- | --- |
| श्री. प्रदिप सावंत | डॉ. मंदार गीते | डॉ. विलास सावंत |
| | वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख | शास्त्रज्ञ कृषि विस्तार |



भाकृअनुप ICAR

कृषि विज्ञान केंद्र

किर्लोस सिंधुदुर्ग

मु.पो. किर्लोस, ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग, फोन नं - (०२३६५) २८०१५७, २८०२६२


कार्णेकर प्रिंटर्स,कणकवली- 86 98 852 815


सिंधुदुर्ग जिल्हा कृषि प्रतिष्ठान
किर्लोस संचलित


भाकृअनुप ICAR


# कृषि विज्ञान केंद्र


किर्लोस सिंधुदुर्ग

मु.पो. किर्लोस, ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग, फोन नं - (०२३६५) २८०१५७, २८०२६२


# नैसर्गिक शेती पद्धत



ब्रिगे. सुधीर सावंत

शेतकऱ्यांचे जीवन आनंदी आणि समृद्ध करण्यासाठी कृषी विज्ञान केंद्र उत्तम काम करत आहे. कृषी संशोधन, शिक्षण, विस्तार व सेवा या क्षेत्रात गेली अनेक वर्षे ही संस्था कार्यरत आहे. विषमुक्त अन्न, प्रदुषणमुक्त पाणी, हवा, पर्यावरण, सुखी व आनंदी जीवन मिळणे हा प्रत्येक सजीवाचा जन्मसिद्ध अधिकार आहे. नैसर्गिक शेती म्हणजे जे निसर्गात दिसते ते. निसर्गाची स्वयंपूर्ण, स्वयंपोषी व स्वयंविकाशी व्यवस्था म्हणजे नैसर्गिक शेती.

पद्मश्री डॉ. सुभाष पाळेकर नैसर्गिक शेतीची चळवळ आम्ही पुढे नेत आहोत. नैसर्गिक शेतीमध्ये शेतकऱ्यांना स्वत:श्रम केल्यामुळे लागवडीचा खर्च अतिशय कमी प्रमाणात येतो. नैसर्गिक शेतीतून तयार होणाऱ्या अन्नाच्या सेवनामुळे आरोग्य उत्तम राहते. रासायनिक खतांच्या अति वापरामुळे जमिनीमध्ये क्षारांचे प्रमाण वाढून जमीन नापीक होते. नैसर्गिक शेतीमध्ये सकारात्मक जागृति होत असून अशा प्रकारे निर्माण होणाऱ्या शेतमालाला देशी व परदेशी बाजारपेठेत जादा भाव मिळतो. शेतकऱ्यांची आर्थिक सुबत्ता वाढते. नैसर्गिक शेती सहजीवन पद्धतीची असते. त्यामध्ये आंतरपिकांची लागवड केल्यामुळे आर्थिक नफा होतो आणि यामुळे मुख्य पिकाची उत्पादन क्षमता वाढते.

जमीन हा संपूर्ण सृष्टीचा मुलभुत आधार आहे. तो एक नैसर्गिक मर्यादित स्वरुपाचा आणि पुर्ननिर्माण न होणारा अनमोल स्त्रोत आहे. मानवी जीवनाच्या अमर्याद गरजा भागविण्यासाठी या संसाधनांचा अविरतपणे वापर होत आहे. भविष्यात अन्नधान्याची सुरक्षितता जोपासण्यासाठी जमिनीचा योग्य वापर करुन शाश्वत व्यवस्थापन करावे लागेल. सुदृढ जीवनासाठी सुदृढ जमिनी आवश्यक आहेत. कृषी विज्ञान केंद्राद्वारे जमिनीचे आरोग्य टिकविण्यासाठी विविध उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. रासायनिक खतांचा अयोग्य वापर व त्याचे होणारे दुष्परिणाम यावर जनजागृती कार्यक्रम गावागावात राबविण्यात येत आहेत. माती परीक्षणानुसार पिकांचे अन्न द्रव्य व्यवस्थापन कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. तसेच पाणी, माती व जैवविविधता यांचे संवर्धन विषयी जनजागृती करण्यात येत आहे.

ब्रिगे. सुधीर सावंत
अध्यक्ष, सिंधुदुर्ग जिल्हा कृषि प्रतिष्ठान, किर्लोस

## बिजामृत

बिजामृत कसे तयार करावे ?

१) पाणी २० लिटर

२) देशी गायीचे शेण १ किलो

३) देशी गायीचे गोमुत्र १ लिटर

४) जीवाणू माती मुठभर

५) कळीचा चुना ५० ग्रॅम

हे बिजामृत रात्रभर भिजत ठेवावे, सकाळी काठीने ढवळाने व बीजसंस्कार करावे. भाजीपाला किंवा पिकांचे जे बी पेरायचे आहे किंवा गादी वाफ्यावर टाकायचं आहे. ते फरशीवर किंवा जमिनीवर पसरावे. त्यावर बिजामृत शिंपडावे व हातांनी बी वरखाली करावे, जेणेकरुन बियांवर बिजामृताचे अस्तर चढेल, सावलीत सुकवावे व पेरावे. भाजीपालाची रोपे लावण्याआधी बीजामृतात मुळया बुडवाव्या, पाच मिनिटे ठेवाव्यात. लावणी करावी.

## जीवामृत

१) गावराणी गायीचे शेण १० किलो (एक घमेल)

२) गावराणी गायीचे गोमुत्र ५ ते १० लिटर.

३) काळा किंवा लाल गुळ २ किलो.

४) कडधान्याचे पीठ २ किलो.

५) पाणी २०० लिटर.

हे द्रावण दोन ते सात दिवस आंबवावे, दिवसातून तीन वेळा काठीने ढवळावे, सावलीत ठेवावे व पिकाला द्यावे.

## घनजीवामृत

बऱ्याच वेळा विशेषत: कोरडवाहू शेतीमध्ये शेतात पाण्याची व्यवस्था नसते. शेताचे जवळपास कोणती दुसरी विहीर नसते. आणि अशा स्थितीत शेतावर जीवांमृत बनविणे शक्य होत नाही. आणि घरुन जीवामृत शेताकडे वाहून नेणे सुद्धा शक्य होत नाही.कारण,पावसाने रस्ते खराब झालेले असतात. बऱ्याच वेळा असे होते कि, पावसाळ्यात पेरणी पासून पिक कापणी पर्यंत कामाची धांदल एवढी वाढते, कि एकतर मजूर उपलब्ध होत नाही आणि जीवामृत बनविण्याला वेळ मिळत नाही. अशा विपरीत स्थितीत जीवामृत वापरणे शक्य होत नाही.याला पर्याय म्हणून मी सिंचित आणि विशेषत: कोरडवाहू शेतीमध्ये जीवामृताला पर्याय म्हणून घनजीवामृत शेतकऱ्यांना दिलेले आहे. जेवढे जीवामृत सिंचित शेतीमध्ये प्रभावी आहे, तसच हे घनजीवामृत सुद्धा कोरडवाहू शेतीमध्ये तेवढंच प्रभावी आहे. घनजीवामृत बनविण्यासाठी आपण देशी गायीचे, देशी बैलाचे, म्हशीचे शेण व बकऱ्यांच्या लेंड्या वापरु शकतो. परंतु कोणत्याही परिस्थितीत जर्सी होलस्टीन चे शेण वापरता येणार नाही. जीवामृत बनविताना गोमुत्राची कोणतीही भूमिका नाही. किंवा असली तरी अगदी नगण्य. जीवामृत तयार झाल्यानंतर सात दिवसात त्याचा उपयोग करावा लागतो. परंतु घनजीवामृत तयार झाल्यानंतर ते वर्षभर साठविता येते व बाराही महिने पाहिजे तेव्हा वापरता येते. घनजीवामृत वाहतुकीला व पेरणीला फारच सोपे आहे.

## घनजीवामृत नं १

वर्षभर साठविलेल्या शेणखताचे खड्यामधील शेणखत माघ महिना ते वैशाख महिन्याचे दरम्यान (महाशिवरात्री व अक्षयतृतीया) खड्डयातून बाहेर उपसून काढावे व चांगले उन्हात वाळवावे. खड्डयातून उपसल्यानंतर शेणखतामध्ये ओलावा असतो. त्या ओलाव्यामुळे शेणखतामधील सूक्ष्म जीवाणू शेणखतातील नत्राचे अमोनियात रुपांतर करतात व परिणामी नत्र मोठ्या प्रमाणात हवेत उडून जातो. परंतु जेव्हा शेणखत आपण उन्हात चांगले वाळवितो. त्यामुळे त्यातील बहुंताश ओलावा हवेत उडून जातो. शेणखतातील सूक्ष्म जीवाणू कोषावस्थेत जातात,जैविक क्रिया थांबवतात. त्यामुळे, नत्राचे आमेनियाच्या रुपात उडून जाणे थांबते व तो साठविलेला नत्रसाठा पिकांना उपलब्ध होतो. शेणखत चांगले वाळवल्यानंतर त्यातील ढेकळे मोगरीने फोडून घ्यावी व चाळणीने चाळून घ्यावे. चाळण्याने त्यांतील दगड, काष्ट पदार्थ, प्लॅस्टिकचे तुकडे ही सगळी प्रदूषके वेगळी होतात. हे चाळलेले शेणखत पन्नास पन्नास किलोच्या थैल्या भरुन सावलीमध्ये त्याची थप्पी लावावी. त्यावर सूर्यप्रकाश पडणार नाही व पावसाचे पाणी पडणार नाही याची दक्षता घ्यावी पेरणीच्या पंधरा दिवस ते एक महिन्याआधी शेणाने सारवलेल्या जमिनीवर किंवा सिमेंट क्रॉंक्रीट केलेल्या फरशीवर किंवा प्लॅस्टिक शीटवर प्रती एकर २०० किलो चाळलेले शेणखत थोडे पसरावे. त्यावर एकूण शेणखताच्या दहा टक्के वजनाचे म्हणजे २० लिटर जीवामृत हाताने शिंपडावे, फावड्याने ते तोडून चांगले आडवे उभे मिसळून घ्यावे. ज्या प्रमाणात जमिनीचे एकूण क्षेत्रफळ पेरायचे आहे, त्याप्रमाणात शेणखत व जीवामृताचे प्रमाण घ्यावे. मिसळल्यानंतर सावलीत त्याचा उभा ढीग लावावा व गोणपाटाने ४८ तास झाकून ठेवावा. ४८ तासामध्ये किण्वन क्रिया पूर्ण होऊन जाते. नंतर ते चांगले वाळवून पोत्यात भरुन ठेवावे व बी पेरणीच्या वेळेस किंवा रोप लावणीच्या वेळेस एका एकराला पेरुन किंवा विस्कटून वापरावे.

## घनजीवामृत नं २

एकरी १०० किलो देशी गायीचे शेण घ्यावे. एक किलो गुळ बारीक करावा किंवा एक किलो गोड फळांचा गर घ्यावा किंवा दोन लिटर उसाचा रस घ्यावा. यापैंकी कोणतेही एक त्या शेणावर सारख्या प्रमाणात विस्कटून टाकावे. त्यावर दोन किलो कडधान्याचे बेसन विस्कटून टाकावे व बांधावरील किंवा जंगलातील मुठभर माती विस्कटून टाकावी. शेण खूपच घटत असेल तर किंवा आवश्यकता असेल तर थोडेसे गोमुत्र त्यात वापरले पाहिजे. आणि मग हे सगळे फावड्याने चांगले आडवे उभे मिसळून त्याचा सावलीत ढीग लावावा. गोणपाट झाकावे व ४८ तास ठेवावे. त्यावर सूर्यप्रकाश पडू देऊ नये व पावसाचे पाणी लागू देऊ नये. ४८ तासानंतर त्याला उन्हात चांगले वाळवावे. त्याची ढेकळे असतील तर मोगरीने बारीक करावी चाळणीने चाळून घ्यावे व साठवावे. व पेरणीच्या वेळेस किंवा रोप लावणीच्या वेळेस एका एकराला पेरावे.

## घनजीवामृताचे लाडू

वरील घनजीवामृत नं २ प्रमाणे शेण, गुळ आणि बेसन एकत्र मिसळून त्यांचे मिश्रण तयार केल्यानंतर व चांगले मिसळून घेतल्यानंतर त्याचे लिंबाएवढे किंवा संत्र्याएवढे हाताने लाडू करावे व उन्हात चांगले वाळवून साठवून ठेवावे. हे लाडू वर्षभर साठविता येतात व जमिनीतील पाहुण्यांना म्हणजे जीवाणूंना खाऊ घालता येते. ठिंबक सिंचन मध्ये ड्रीपरच्या खाली जमिनीवर एक लाडू ठेवावा. तो गवताने झाकून घ्यावा व त्या गवतावर ड्रीपरचे पाणी पडू द्यावे. त्यामुळे पाणी सारख्या प्रमाणात सभोवताल समांतर पसरेल व पाण्यासोबत लाडू थोडा थोडा विरघळून घनजीवामृताचे सजीव अवशेष जमिनीमध्ये पसरेल व त्याचा लाभ मिळेल. पिकांच्या दोन रोपांच्या मध्ये जमिनीवर पावसाळ्यामध्ये एक लाडू ठेवावा. जमिनीतील ओलाव्याने किंवा पावसाळ्याने तो हळूहळू विरघळतो व जमिनीवर पसरतो.

## ताज्या शेणाचा वापर

कधी कधी आवश्यकतेपेक्षा जास्त शेण व गोमुत्र उपलब्ध असते. तसेच, अनेक कारणांमुळे म्हणजे मजूर उपलब्ध नसणे, वेळ नसणे, जीवामृत बनविण्यासाठी आवश्यक गुळ, बेसन उपलब्ध नसते किंवा जीवामृत बनविणे शक्य नसते अशा स्थितीत रोजचे देशी गायीचे ताजे शेण व मूत्र सरळ सिंचनाचे पाण्यावाटे शक्य नसते. अशा स्थितीत रोजचे देशी गायीचे ताजे शेण व मूत्र सरळ सिंचनाचे पाण्यावाटे देणे उत्तम आहे. अशा वेळेस गायीचे ताजे शेण गोमुत्रात मिसळून घ्यावे. (एकूण शेणाचे ५% गोमुत्र) एका ज्यूटच्या पोत्यामध्ये (बारदानात) भरावा. व त्याचे तोंड सुतळीने किंवा नारळाच्या दोरीने घट्ट बांधावे. प्लॅस्टिकची दोरी वापरु नये व ज्या हौदात विहिरीचे डिलिव्हरी पाईप मधून पाणी पडते, त्या हौदात पाईप मधून पडणाऱ्या धारेखाली ते पोते रोज ठेवत जावे. मोटार चालू होताच डिलिव्हरी पाईप मधून ते पाणी या पोत्यावर पडते व त्या शेण गोमुत्राच्या अंश मुख्य नळीतून पाण्यासोबत जमिनीतील मुळापर्यंत पोहोचवता येते. ज्याला जीवमृत व घनजीवामृत बनविणे शक्य नाही त्याला हा उपाय सर्वोत्तम आहे. अशावेळी जीवामृत किंवा घनजीवामृताचा परिणाम त्वरित मिळतो.

## दशपर्णी अर्क

दशपर्णी अर्क एक अत्यंत गुणकारी नैसर्गिक कीटकनाशक आहे. दशपर्णी अर्क शेतकरी आपल्या घरच्या घरीच बनवू शकतो.एका प्लॅस्टिक ड्रममध्ये किंवा सिमेंट हौदात किंवा लोखंडी ड्रममध्ये किंवा मातीच्या हौदात २०० लिटर पाणी घ्या. त्यामध्ये २ किलो देशी गाईचे शेण हातानी कालवून टाका. त्यानंतर त्यामध्ये देशी गाईचे १० लिटर गोमुत्र टाका. नंतर त्यामध्ये २०० ग्रॅम हळद पावडर व २०० ग्रॅम सुंठ पावडर किंवा ५०० ग्रॅम अद्रकाची चटणी टाका.नंतर त्यात १ किलो खाण्याचा तंबाखूची भुकटी टाका. नंतर त्यामध्ये १ किलो तिखट हिरवी मिरचीची चटणी टाका. जर हिरवी मिरची उपलब्ध नसेल तर १/२ किलो वाळलेल्या मिरचीची पावडर वापरु शकता. त्यानंतर १ किलो देशी लसुणची चटणी बनवून पाण्यामध्ये टाका. त्यानंतर २ किलो देशी झेंडूची झाडे (पान, फूल, मुल व खोड यासहीत) घ्या व त्याचे बारीक बारीक तुकडे करुन त्या पाण्यामध्ये टाका. त्यानंतर एका काडीने ह्या सर्व वनस्पती त्या पाण्यामध्ये घड्याळाचे काट्याप्रमाणे डावीकडून उजवीकडे चांगले ढवळून घ्या.त्यानंतर ३ किलो कडूनिंबाची पाने (छोट्या फांद्या पानांसह) बारीक तुकडे करुन त्या पाण्यात टाका. नंतर २ किलो कारंजाची पाने (छोट्या छोट्या फांदीसह) बारीक तुकडे करुन त्या पाण्यात टाका. नंतर २ किलो सीताफळांची पाने त्या पाण्यात टाका. त्यानंतर २ किलो एरंडीची पाने त्या पाण्यात टाका. त्यानंतर २ किलो घाणेरीची पाने त्या पाण्यात टाका.


वरील हे पाच वनस्पती प्रकार महत्वाचे आहेत. खालील एकूण ४५ वनस्पतींपैकी कोणतेही अन्य पाच वनस्पती प्रकार घ्यावे. २ किलो धोतराची पाने, २ किलो बेलाची पाने, २ किलो तुळशीची पाने, २ किलो रुईची पाने, २ किलो तारोताची पाने, २ किलो पपईची पाने, २ किलो महानिबांची पाने, २ किलो पेरुची पाने, २ किलो आंब्याची पाने, २ किलो पळसाची पाने, २ किलो महानिबांची पाने, २ किलो पेरुची पाने, २ किलो आंब्याची पाने, २ किलो पळसाची पाने, २ किलो कान्हेराची पाने, २ किलो कारल्याची पाने, २ किलो निर्गुडीची पाने, २ किलो जास्वंदाची पाने, २ किलो शेवग्याची पाने, २ किलो अर्जुनाची पाने, २ किलो चिंचेची पाने, २ किलो मोहाची पाने, २ किलो अश्वगंधाची पाने, २ किलो डाळींबाची पाने, २ किलो बाभुळीच्या फांद्या, २ किलो नागरमोथाची पाने, २किलो कोरांताची पाने, २ किलो पिंपलीची पाने, २ किलो वेखंडाची मुळी, २ किलो कांचनाची पाने, २ किलो शतावरीची पाने, २ किलो शंखपुष्पीची पाने, २ किलो गुळदांडीची पाने, २ किलो भारंगीची पाने, २ किलो भुईआवळयाची पाने, २ किलो अशोकाचे झाडाची पाने, २ किलो अनंतमूळची पाने, २ किलो सर्पगंधाची पाने, २ किलो दुधानिची पाने, २ किलो आघाडीची पाने, २ किलो रानतुळसची पाने, २ किलो कुटकीची पाने, २ किलो गुळवेलची पाने, २ किलो हिंगनबेटची पाने, २ किलो गोकर्णीची पाने, २ किलो बावचीची पाने, २ किलो ब्राम्हीची पाने, २ किलो कुचलाची पाने.




२०० लीटर जीवामृत
अर्कासाठी लागणारे साहित्य :-



कृषी ऋषी सुभाष पाळेकर प्रेरित
स्थानिक व औषधी वनस्पतींचे


Drinking Water
GPS Map Camera
Devgad, Maharashtra, India
99MP+PR8, Devgad, Maharashtra 416613, India
Lat 16.383976°
Long 73.387474°
06/07/22 02:23 PM
Google


vivo Y73


vivo Y73 · Jayesh


vivo Y73 · Jayesh